**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१६.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १०६६ / पुणे / २००७ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.गुलाब सिताराम जाधव<br>४७/३, भावेश सो.तावरे कॉलनी,<br>हॉटेल नवरत्न पाठीमागे, पुणे-सातारा रोड, पुणे | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | निवासी नायब तहसीलदार, खेड, जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | तहसीलदार, खेड, जि.पुणे | हजर |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.गुलाब सिताराम जाधव यांनी दि.२६.६.२००७ रोजीचे अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खेड यांच्याकडे मौजे वाकी खुर्द, ता.खेड येथील जमीन गट नं.१८३ चे फेरफार उतारे क्र.३८९ व ३९८ मागितले होते.

जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खेड यांनी त्यांच्या दि.११.७.२००८ च्या निवेदनात 'अर्जदार यांनी मागणी केलेले वाकी खुर्द येथील फेरफार क्र.३८९ व ३९८ च्या नकला मा.उपविभागीय अधिकारी, जुन्नर उपविभाग, खेड यांच्या कार्यालयातील बिगरशेती प्रकरणात उपलब्ध असल्याचे समजल्यावरुन सदर नकलांच्या झेरॉक्स प्रती अर्जदारास अलाहिदा या कार्यालयाकडील पत्राने विनामूल्य पाठविणेत आल्या आहेत,' असे नमूद केले आहे. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्ता यांनी 'जिल्हाधिकारी यांचे आदेशाप्रमाणे रिव्ह्यू प्रोसेस संपूर्ण झाल्यास माझी या अर्जाबाबत

काही तक्रार राहणार नाही. फेरफार उतारे ३०.९.२००८ ला मिळाले,' असे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांनी त्यांना माहिती दिलेली आहे. प्रपत्रातील अपीलकर्ता यांची मागणी पाहता ती प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि. १५.१२.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

डिसेंबर-२००८मौ

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे विशेष अपील निर्गत कार्यक्रम दि. १९.११.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलांचा समावेश होता.

| अ क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ११५३/ सोलापूर | श्री. रमेश बापूराव पाटील मु. पो. श्रीपूर, पिवळीचाळ, ता.माळशिरस, जि. सोलापूर | मुख्याध्यापक, श्री चंद्रशेखर विद्यालय व नारायणकाका आगाशे कनिष्ठ महाविद्यालय, श्रीपूर, ता.माळशिरस, जि. सोलापूर | शिक्षणाधिकारी (माध्य), जिल्हा परिषद,सोलापूर | प्रशालेतील स्थायी व अस्थायी शिक्षक व शिक्षकेत्तर सेवक यांची हव्या असलेल्या विवरणपत्रात माहिती, शैक्षणिक वर्ष २००५ - ०६ ते ०७-०८ या कालावधीतील रिक्त पदावर मात्र वट्टवेतनावर किंवा मानधनावर कार्यरत सेवकांची नावे यापैकी एखाद्या सेवकास संस्थेने शिक्षक सेवक म्हणून नेमणूक दिली होती काय, संस्थेत जिल्हा परिषद मार्फत श्री. का. व. बागडे व श्री. तु. ग. माने यांची संस्थेने सेवा ज्येष्ठता मान्य केली काय, या सेवकांची सेवा ज्येष्ठता अनुक्रमांक, व इतर मुद्यांची माहिती. | मूळ अर्ज (जोडपत्र - अ) व प्रथम अपील अर्ज (जोडपत्र - ब) यातील माहितीची मागणी एकच असावी, अपीलकर्त्याने मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त माहिती अपिलात मागितली आहे. मूळ मागणीनुसार व नंतर मागितलेली माहितीही दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | १११७/ सोलापूर | श्री. हनुमंत वासुदेव खरात चव्हाण प्लॉट, उपळाई रोड, मु. पो. ता. बार्शी, जि. सोलापूर | माहिती अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद सोलापूर | उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद सोलापूर | गटविकास अधिकारी श्री. चिल्लाळ यांचा चौकशी अहवाल. | माहिती मिळाल्याने समाधान झाल्याचे दि. १५.१२.०८ चे निवेदन अपीलकर्त्याने आयोगास सादर केले. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

वरील तक्त्यातील १ व २ अपिले (अ.क्र ११५३ व १११७) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ३१.१२.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.१६.७.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपीलाचा समावेश होता.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १२०४ / पुणे / २००७ | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री.पंढरीनाथ महिपती बांदल<br>७९/४+५, भागिरथी निवास, पीएमटी डेपोमागे, कोथरुड, पुणे-४११०२९ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय पोलीस अधिकारी(देहूराड विभाग), जि.पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | अप्पर पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पाषाण, ता.हवेली, जि.पुणे | हजर |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.पंढरीनाथ महिपती बांदल यांनी दि.७.७.२००७ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी (देहूरोड), जि.पुणे यांच्याकडे दि.२८.६.२००७ रोजी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा तपशील मागितला होता.

मागणी केल्याप्रमाणे सर्व माहिती मिळाली असल्याने आपले अपील निकाली काढण्याबाबत अपीलकर्त्याने दि.११.७.२००८ रोजी आयोगास कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

पुणे
दि.१२.१२.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

प्रति

श्री. सुभाष भिमराव गावसाने
मु. पो. ता. माढा, जि. सोलापूर — अपीलकर्ता

**विरूध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
सहायक निबंधक ,
सहकारी संस्था, सोलापूर
जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सोलापूर
यांचे कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | **अपील क्रमांक** | १२६२ / सोलापूर |
| २ | **जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख** | दि.१०.१०.२००८ |
| ३ | **जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख** | दि. २४.१०.२००८ |
| ४ | **प्रथम अपिलाची तारीख** | दि. -- |
| ५ | **अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख** | दि. --- |
| ६ | **<u>मूळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>**<br>शंकरराव माहिते पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्या., बारलोणी या संस्थेच्या कारभाराबाबत तसेच संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नेमणूक ज्या कायदेशीर बाबीमुळे केली नाही याची माहीती. | |

**<u>विवेचन</u>**

शंकरराव माहिते पाटील नागरी सहकारी पतसंस्था मर्या.,बारलोणी या संस्थेच्या कारभाराबाबत तसेच संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नेमणूक करण्याचा आदेश होऊनही. ज्या कायदेशीर

बाबीमुळे केली नाही. त्याची माहिती अपीलकर्ता श्री. सुभाष भिमराव गावसाने यांनी जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, सोलापूर यांच्याकडे मागितली होती.

सदर संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ खाली चौकशी करण्याबाबत दि. १२.६.०८ च्या आदेशान्वये चौकशी आदेश निर्गमित केलेले आहेत. सद्यस्थितीत चौकशी कामकाज चालू आहे. चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जन माहिती अधिकारी यांनी दि.२४.१०. ०८ च्या पत्रान्वये अपिलकर्त्यास कळविले. श्री. गावसाने यांनी या संदर्भात भाष्य केले असून स्पष्टीकरण मागितले आहे.तसेच त्यांनी संबधीत अपिलीय प्राधिकारी यांच्याकडे प्रथम अपिल केले नाही. खुलासा, अभिप्राय मागणे ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र सबंधित विषयातील कार्यवाहीची अद्ययावत मा[illegible]ी अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

२) मूळ अर्जात नमूद केलेल्या संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नेमणूक करण्याबाबतच्या दि. १२.६.०८ च्या आदेशावरील कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी तथा सहायक निबंधक सहकारी संस्था, सोलापूर अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,सोलापूर यांनी अपीलकर्त्यास आदेश मिळाल्यापासून आठ दिवसांत उपलब्ध करून द्यावी व पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. २९.१२.२००८

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
**नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,**
**कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१**

श्री.नितीन मारुती जगताप
हिंगणगाव, ता.इंदापूर, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे, सिंचन भवन, पुणे-११ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे, सिंचन भवन, पुणे-११

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३४ / ~~सांगली~~ पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २१.५.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे, सिंचन भवन, पुणे-११ श्री.राजेंद्र पवार

**जन माहिती अधिकारी** तथा अधीक्षक अभियंता,
कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे, सिंचन भवन, पुणे-११ श्री.अे.आर.केंदळे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३१.१.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ४.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २०.४.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>कुकडी मंडळातील झालेली कामे, कामांची प्रशासकीय रक्कम, कामे पूर्ण, अपूर्ण किती, सर्व कामांच्या निविदा, निविदा प्रसिध्द केलेल्या वृत्तपत्रांची नांवे, दिनांक व छायांकित प्रती, महाराष्ट्र दर्शनाला गेलेल्या कर्मचाऱ्यांच्या नावांची यादी व माहिती, प्रवास भत्ता बिले, आपल्या कार्यालयाकडील प्राप्त तक्रारी व माहिती अर्ज कारवाईसह. | |

# विवेचन

अपीलकर्ता श्री.नितीन मारुती जगताप यांनी कुकडी प्रकल्प मंडळाकडील कामाच्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, पुणे यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांकडून माहिती न मिळाल्यामुळे श्री.जगताप यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, पुणे यांच्याकडे अपील केले. आपण दारिद्र्यरेषेखालील यादीत असल्यामुळे माहिती निःशुल्क द्यावी, अशी मागणी श्री.जगताप यांनी केली होती. दारिद्र्यरेषेखाली असल्यास प्रमाणपत्र सादर केल्यास त्यानुसार माहिती द्यावी, असा निर्णय अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, सिंचन भवन, पुणे यांनी दिला. परंतु तरीही आपल्याला माहिती मिळाली नाही, या कारणावरुन श्री.जगताप यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

दि.१९.३.२००८ च्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. तीनही घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२१.५.२००८ रोजी घेण्यात आली.

श्री.जगताप यांचा समावेश दारिद्र्यरेषेखालील यादीमध्ये होतो की नाही, हा या अपिलातील प्रमुख मुद्दा आहे, असे श्री.जगताप, जन माहिती अधिकारी श्री.अे.आर.केंदळे व अपिलीय प्राधिकारी श्री.राजेंद्र पवार यांनी विविध कागदपत्रांद्वारे प्रतिपादन केले. अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता यांनी दि.१६.५.२००६ रोजी आपल्या दारिद्र्यरेषेखालील दाखल्याबाबतची विचारणा गटविकास अधिकारी, इंदापूर यांच्याकडे केली. गटविकास अधिकाऱ्यांनी दि.२२.५.२००६ रोजी सविस्तर खुलासा सादर करुनही आपल्याला माहिती दिली गेली नाही, असे श्री.जगताप यांनी लेखी निवेदनात नमूद केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे व अधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ यांच्यामध्येही याबाबत पत्रव्यवहार झाला असून राज्य मुख्य माहिती आयुक्तांकडे दि.४.७.२००६ रोजी दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीना द्यावयाच्या माहितीबाबत मार्गदर्शन मागितले आहे. श्री.जगताप यांना हव्या असलेल्या माहितीचा खर्च २ लाख १२ हजार ३२० रुपये आहे. तसेच माहिती

विस्तृत स्वरुपाची व विभागीय स्तरावरील असल्याने इतर जन माहिती अधिकाऱ्यांकडून संकलन करुन द्यावी लागणारी आहे. या संकलनासाठी लागणारा वेळ व खर्च याचा विचार करता किती माहिती निःशुल्क द्यावी याबाबतचे मार्गदर्शन त्यात मागितले आहे, असे अधीक्षक अभियंता श्री.राजेंद्र पवार यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. श्री.जगताप यांच्या वडिलांचे नांव सन १९९७-९८ च्या सर्वेक्षणानुसार दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या यादीत आहे, परंतु शासनाने सन २००२ -२००७ मध्ये केलेल्या यादीच्या सर्वेक्षणामध्ये त्यांचे नांव समाविष्ट नाही, असे गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर यांनी दि.७.७:२००६ च्या पत्रान्वये कळविले आहे, असेही श्री.पवार यांनी सांगितले. शुल्क भरल्यास श्री.जगताप यांना माहिती त्वरित देण्यात येईल, असेही प्रतिपादन त्यांनी केले.

श्री.जगताप यांच्या दारिद्र्यरेषेखालील यादीतील समावेशाबाबत उलटसुलट अभिप्राय असल्याचे उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसते. आपण एकत्र कुटुंबात असल्यामुळे कुटुंबातील सदस्य म्हणून दारिद्र्यरेषेखालील यादीत आपला समावेश ग्राह्य धरला पाहिजे, असे श्री.नितीन जगताप यांचे म्हणणे आहे, तर श्री.नितीन जगताप हे १८ वर्षे वयावरील असल्याने व ते अर्थार्जन करीत असल्याने त्यांचे उत्पन्न दर्शवून योग्य ते प्रमाणपत्र दिले गेले पाहिजे, असे कुकडी प्रकल्प मंडळाचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे आहे.

यापूर्वीही अपील क्रमांक/८४ मध्ये या मुद्दयांचा समावेश होता.

जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केलेल्या माहितीचे शुल्क लक्षात घेता माहिती विस्तृत प्रमाणावर आहे, हे स्पष्ट होते. माहिती देण्यासाठी उपलब्ध साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागणार असल्यास माहिती नाकारण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम ४ मध्ये आहे, ती लक्षात घेता किती प्रमाणात माहिती निःशुल्क द्यावी हे त्या त्या कार्यालयाच्या उपलब्ध साधनसामग्रीनुसार व मागितलेल्या माहितीनुसार संबंधित अधिकारी ठरवू शकतील, मात्र माहिती नाकारण्यासाठी सबब म्हणून या तरतुदीचा वापर होता कामा नये, म्हणून त्याबाबतचे तपशीलवार स्पष्टीकरण संबंधित अधिकाऱ्यांनी द्यावे लागेल.

सर्व कागदपत्रांचे अवलोकन अपीलकर्त्याला नि:शुल्क करु देणे व १०० प्रतीपर्यंतची माहिती नि:शुल्क देणे हा यातील एक पर्याय असू शकतो, त्यानुसार जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास कागदपत्रांचे अवलोकन करु द्यावे.

दारिद्र्यरेषेखालील यादीतील व्यक्तींना द्यावयाच्या माहितीबाबत सातत्याने अशा स्वरुपाचे प्रश्न निर्माण होत असल्याचे विविध अपिलांवरुन दिसते. तसेच काही प्रकरणांमध्ये दारिद्र्यरेषेखालील दाखले चुकीचे असल्याचेही निदर्शनास आले आहे. ही स्थिती लक्षात घेता दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींची यादी विशिष्ट कालावधीत अद्ययावत करीत राहणे, तसेच या यादीतील समावेशाबाबतच्या नियमांचे व निकषाचे काटेकोर पालन करणे आणि असे पालन न करता दाखले दिले असल्याचे, तसेच संबंधिताने चुकीची माहिती सरकारी यंत्रणेस पुरविल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित अधिकाऱ्यांवर / संबंधित व्यक्तीवर शिस्तभंगाची /फौजदारी कारवाईसारखी कारवाई करणे आवश्यक आहे. याची दखल घेऊन मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी आवश्यक ती कारवाई करावी, अशी सूचना आयोग करीत आहे.

**<u>आदेश</u>**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) अपीलकर्ता श्री.नितीन जगताप यांना संबंधित कागदपत्राचे अवलोकन करुन १०० पानापर्यंतची माहिती जन माहिती अधिकारी तथा उपअधीक्षक अभियंता, कुकडी प्रकल्प मंडळ, पुणे यांनी नि:शुल्क द्यावी.

(३) श्री.नितीन मारुती जगताप यांच्या दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्यायादीतील समावेशाबाबतच्या वस्तुस्थितीचा अहवाल गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इंदापूर, जि.पुणे यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांत आयोगाला सादर करावा.

(४) दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींच्या यादीबाबत मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांनी फेरतपासणी करुन निकषानुसार पात्र व्यक्तींचा समावेश यादीत होईल याबाबतची कार्यवाही सुरु करावी. त्याबाबत आयोगास एक महिन्यात अवगत करावे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१.१२.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालील प्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४००/ पुणे | श्री. सुश्चेंद्र सीताराम कामे रा.इंद्रायणी इन्क्लेव्ह, बि.नं.१२/१, मोदी सॅनेटोरियम जवळ, नांगरगाव, लोणावळा, ता.मावळ, जि.पुणे | सहाय्यक आयुक्त, व्यसनमुक्ती कार्यालय, समाजकल्याण संचालनालय, पुणे-१ | सह संचालक, व्यसनमुक्ती कार्यालय, समाजकल्याण संचालनालय, पुणे-१ | माहे एप्रिल १९९९ ते मार्च २००३ या कालावधीतील जिल्हा दारूबंदी प्रचार अधिकारी, समाजकल्याण, जिल्हा परिषद, उस्मानाबाद या कार्यालयात तुळजापूर येथे भाड्याने दिलेल्या संस्कार वर्गाचे भाडे मिळण्याबाबत | मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र थकित भाडे मिळाल्याचे अपीलकर्त्याने दि. १३.११.२००६ रोजी संबंधित कार्यालयास कळविले आहे. |
| २ | २११५/ पुणे | श्री. चंद्रकांत गोपाळ कदम रा. ७, नृसिंह हौसिंग सोसायटी, शितोळेनगर, सांगवी, पुणे-२७ | प्रशासन अधिकारी, (करसंकलन ), सांगवी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ | करआकारणी व करसंकलन प्रमुख, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ | सन २००३ मध्ये मिळकतीची नोंद करण्यात आलेली नाही. तसेच गुंठेवारीचे पैसे भरून देखील नकाशा दिलेला नाही. | अपीलकर्त्याची मागणी प्रशासकीय कार्यवाहीशी संबंधित असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र त्याबाबतच्या कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्वरित द्यावी. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १६०३ / पुणे | श्री. मधुकर विष्णू कुबेर रा.प्लॉट नं.अ२/७, रामबाग वसाहत, महाराष्ट्र पी.डी.डी.ए.को.ऑप. सोसायटी, नवी पेठ, पुणे-३० | सचीव, महाराष्ट्र पी.डी.डी.ए.को.ऑप. सोसायटी, नवी पेठ, पुणे-३० | उपनिबंधक (१) सहकारी संस्था, पुणे शहर, मार्केट यार्ड, पुणे-३७ | रामबाग वसाहतीमधील गाळाधारक व संस्थेबाबत विविध मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्याचे निधन झाल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | ११७८ / पुणे | श्री. निमराज पंढरीनाथ विसपुते रा.१५.ब, स्वामी समर्थ को.ऑप. हौ.सोसायटी, स.नं.१४८/१अ/१/२ पाषाण, सूस रोड, पाषाण, पुणे-२१ | सहकारी अधिकारी श्रेणी-२, अधिन उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर (४), पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ | सदर संस्थेविरूध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १६४ अन्वये निबंधकास द्याव-याच्या नोटिसमधील शेवटच्या परिच्छेद ३ मधील माहिती मागितली आहे. | माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज न करता अपील ग्राह्य मानता येणार नाही. अर्ज केल्यास माहिती देण्याची तयारी जन माहिती अधि-काऱ्यांनी प्रपत्रात दर्शविली आहे. |
| ५ | १४५१ / पुणे | श्री. अशोक शंकरराव कुंभारे रा.फ्लॅट नं.५, राजयोग पार्क ऐ, विनायक नगर, नवी सांगवी, पुणे | विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे-४२ | विभागीय समाजकल्याण अधिकारी, पी.एम.टी. बिल्डिंग, स्वारगेट, पुणे-४२ | कु. तृप्ती व कु. प्रतिक डॉ. डी.वाय.पाटील टेक्नॉलॉजी व इंजिनिअरींग कॉलेज, पिंपरी यांच्या फ्रीशिपच्या अनु-षंगाने एकूण ८ मुद्दे | अपीलकर्त्याने मागितलेली माहिती 'कार्यवाही' ची असून या बाबीचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

वरील तक्त्यात नमूद केलेली सर्व अपिले (क्र. १४००, २११५, १६९३, ११७८ व १४५१) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ३१.१२.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १४४६/ पुणे | श्री. अजित धनंजय पाडकर सणस क्लासिक, फ्लॅट नं.९, प्लॉट नं.७९/१, माऊंट कॉरमेल हायस्कूलजवळ, लुल्लानगर, पुणे-४० | सहाय्यक पोलीस आयुक्त, चतुश्रृंगी विभाग, पुणे | पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे | अपीलकर्त्याच्या गाडीच्या दि. १७.४.२००७ रोजी झालेल्या अपघाताच्या अनुषंगाने एकूण नऊ मुद्दयांची माहिती | आवश्यक ती कागदपत्रे मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १८२३/ पुणे | श्री. पुखराज शामाजी गादिया रा. कामशेट, ता.मावळ, जि. पुणे | सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., राजगुरूनगर विभाग, शामली बिल्डिंग, वाडा रोड, राजगुरू-नगर, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्या., राजगुरूनगर विभाग, शामली बिल्डिंग, वाडा रोड, राजगुरूनगर, जि.पुणे | मीटर जलद असल्याबाबत आपणाकडे असलेले तांत्रिक यंत्र व त्याबाबतचा अहवाल, मीटर बदलण्याची जबाबदारी कोणाची इत्यादी माहिती | आवश्यक ती कागदपत्रे मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १६५५/ पुणे | श्री. हनुमंतराव यशवंतराव गायकवाड रा. परिमल हौसिंग सोसायटी, मूकबधीर शाळेसमोर, पडस्थळ रोड, इंदापूर, जि. पुणे | सहाय्यक शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे कार्यालय, (उच्च माध्यमिक विभाग), १७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-१ | शिक्षण संचालक, विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांचे कार्यालय, (उच्च माध्यमिक विभाग), १७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे-४११ ००१ | शिवाजी महाविद्यालय बार्शी, जि.सोलापूर येथील कनिष्ठ महाविद्यालयात उपप्राचार्य पदाबाबत एकूण तीन मुद्दयांची माहिती | आवश्यक ती कागदपत्रे मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | १६६३ / पुणे | श्री. संजय वासुदेव नानिवडेकर १०४, मयुरेश अपार्टमेंट, मयूर कॉलनी, कोथरूड, पुणे | सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा-१, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे-१ | पोलीस उपायुक्त, गुन्हे शाखा-१, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे-१ | श्री. जयंत बा. देसाई व कु. रूपा दळवी यांच्या केस मधील जाबजबाब व इतर कागद पत्रांची माहिती | आवश्यक ती कागदपत्रे मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | १६५३/ पुणे | श्री. अशोक रामभाऊ गवळी मु.पो. धायरी, ता. हवेली, जि. पुणे | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, पुणे | मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), जिल्हा परिषद, पुणे | सन २००० मधील किर्कटवाडी ग्रामपंचायतीच्या शौचालयाच्या कामाबद्दलची माहिती | आवश्यक ती कागदपत्रे मिळाल्याचे अपीलकर्त्यांने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले (क्र. १४४६, १८२३, १६५५, १६६३ व १६५३ ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १७ .१२.२००८**

(राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १५८६/ पुणे | श्री. बिंदूमाधव रघुनाथ पारखी ११४, आलीशान को.ऑप.हौसिंग सोसायटी लि. ८१८, भांडारकर रोड, पुणे-४ | उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, पुणे शहर (१), स.नं.५८२ डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-३० | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालय, पुणे शहर (१), स.नं.५८२ डी, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे-३० | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०, कलम १०१ अन्वये दि.१२.६. २००१ रोजी दिलेल्या वसुली दाखल्याच्या अनुषंगाने माहिती | प्राप्त माहितीने समाधान झालेले असल्याने अपील निकाली काढण्या बाबत अपीलकर्त्याने दि.१२.११.२००८ रोजीच्या अर्जान्वये आयोगास कळविले आहे. |
| २ | १८८३/ पुणे | श्रीमती डेजी जेओ बोथल्लो द्वारा श्रीमती ट्रेसा डिसोजा, फ्लॅट नं.२०३, बिल्डिंग नं.एफ, गंगासवेरा, वानवडी, पुणे-४० | नगर भूमापन अधिकारी क्र.२, शुक्रवार पेठ, तहसील आवार, पुणे-२ | अधीक्षक भूमि अभिलेख, जिल्हाधिकारी कार्यालय, आवार, पुणे-१ | मौजे नानापेठ, पुणे सि.स.नं. ९७४ वरील अपार्टमेंट नं.१, क्षेत्र १११.५० चौ-मी. या मिळकतीवर खरेदी प्रमाणे नावे नोंद घेण्यासाठी दि. ११.६.२००७ रोजी केलेल्या अर्जा बाबत माहिती | जन माहिती अधिकारी / अपिलीय प्राधिकारी यांनी आवश्यक ती माहिती दि. १०.६.२००७ रोजी दिल्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | १८८५ / पुणे | श्री. सुनिलकुमार बावधनकर चोपडे एजन्सीज अँड कन्सल्टीज , हिरामण लांडे बिल्डिंग, मंबई पुणे रोड, कासारवाडी, पुणे | प्रमुख लिपिक, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा | जिल्हाधिकारी सातारा | श्री. गणेश सिताराम देशपांडे यांनी दि. १६.१२.२००७ रोजी दाखल केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ४ | १४९३ / पुणे | श्रीमती रूपाली अजित पै एलफिस्टन महाविद्यालय, मुंबई-३२ | प्रशासन अधिकारी, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | संचालक, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ | सेवा विषयक बाबी संबंधात एकूण पाच मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ५ | १५४३ / पुणे | श्री. शांतीलाल सोमा तांबे मु.पो.सणसवाडी, ता.शिरुर, जि. पुणे | उप विभागीय पोलीस अधिकारी, शिरूर, जि. पुणे | पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, पुणे | पोलीस स्टेशन, शिक्रापूर, ता. शिरूर येथील गुन्हा क्र.१५६/२००६ बाबतची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने दि. २५.११.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. |
| ६ | १७९७ / पुणे | श्री. सुनिल सिताराम सुबंध मु.पो.वडगाव - निबांळकर, ता. बारामती, जि. पुणे | माहिती अधिकारी अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे | अपिलीय प्राधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, पुणे विभाग, पुणे | दि. २८.९.२००७ रोजीच्या तक्रार अर्जास अनुसरून एकूण चार मुद्दयांची माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ७ | १७९३/ पुणे | श्री. दिनकर साहेबराव सोनवणे मु.पो. राहू, ता.दौंड, जि.पुणे | मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा देखरेख संघ, पुणे जिल्हा, पुणे लक्ष्मी रोड, सिटी पोस्ट, पुणे | जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, पुणे, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे | मौजे राहु, ता.दौंड येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे सचीव श्री. खंटे यांना मुदतवाढ दिलेल्या ठरावाची प्रत | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | १७७४/ पुणे | श्री. नामदेव शामराव नालंदे व्हील कॉलनी, बारामती, जि.पुणे | कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, (पूर्व), मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मध्यवर्ती इमारत, पुणे-१ | बारामती ते सांगवी या रस्त्याच्या कामाच्या निविदेबाबत माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ९ | १७५८/ पुणे | श्री. राजेंद्र राणोजी उजागरे स.नं. १९१, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, एल २०/८०, येरवडा, पुणे-४११ ००६ | अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे | सहाय्यक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ढोले पाटील रोड, पुणे | अखिल महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, नागपूर चाळ, नवरात्र उत्सव समितीबाबत एकूण ८ मुद्दयांची माहिती | आवश्यक माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| १० | १७०९/ पुणे | श्री. माधव शंकर पिसाळ सर्व्हे नं.२०/२, घर नं.३००/६, काशिनाथ पाटील नगर, धनकवडी, पुणे-४३ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत आखाडे, ता. जावली, जि. सातारा | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, जावळी (मेढा) ता. जावळी, जि. सातारा | मौजे जावळी येथील घर नं.११०, १११, ११२ व १०५ येथील नोंदीबाबत माहिती | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ११ | १७०२ / पुणे | श्री. अशोक मारूती टेमगिरे रा. आळंदी देवाची, ता. राजगुरूनगर, जि. पुणे | निवासी नायब तहसीलदार, राजगुरूनगर, ता.राजगुरूनगर जि. पुणे | तहसीलदार, राजगुरूनगर, ता.राजगुरूनगर जि. पुणे | श्री. पांडुरंग आप्पा वहिले यांचा दि. १७.५.२००१ चा अर्ज, त्यांचा दि.३.९.२००१ रोजीचा जबाब व मंडल अधिकारी आळंदी यांचे पत्र क्र.जा.क्र./१९९/ २००१ दि. ९.१०.२००१ ची प्रत | आवश्यक ती माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | १६८० / पुणे | श्री. शेख हुसेन अहमद तांबोळी चेअरमन, दि मुस्लीम जमात हुसेन शहा बाबा ट्रस्ट, सर्व्हे नं. १५७/१/२, मदिना मस्जिद, मेंटल हॉस्पिटल, येरवडा, पुणे-६ | चेअरमन, दि मुस्लीम जमात हुसेन शहा बाबा ट्रस्ट, सर्व्हे नं. १५७/१/२, मदिना मस्जिद, मेंटल हॉस्पिटल, येरवडा, पुणे-६ | सहाय्यक धर्मादाय आयुक्त, ढोले पाटील रोड, वाडिया कॉलेज समोर, पुणे-१ | सन १९९८ पासून माहे ऑक्टोबर २००७ पर्यंत झालेल्या जमा खर्चाच्या नकला | अपील मागे घेत असल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील सर्व अपिले (क्र. १५८६, १८८३, १८८५, १४९३, १५४३, १७९७, १७९३, १७७४, १७५८, १७०९, १७०२ व १६८० ) निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. १५ .१२.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :

| अ. क्र | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १७६०/ पुणे | श्री. दिनकर सदाशिव कांबळे रा. ४०, वानवडीगाव, पुणे | कक्ष अधिकारी, समाजकल्याण (गट अ ) समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे | समाज कल्याण अधिकारी, ( गट अ ) समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, पुणे | शारीरिक शिक्षण निर्देशक या पदाच्या भरती प्रक्रियेबाबत एकूण १५ मुद्दयांची माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी दि. १०.१२.२००८ पर्यंत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| २ | १६०७/ पुणे | श्री. अंगद नरहरीराव भोसले सर्व्हे नं.५३/५८, साईनाथनगर, वडगाव शेरी, पुणे-१४ | प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, मध्यवती इमारत, पुणे | शिक्षण सह संचालक शिक्षण विभाग (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, मध्यवती इमारत, पुणे | शासन निर्णय व कार्यालयीन आदेशाच्या प्रती मिळणेबाबत | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी ५ दिवसात माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ३ | १५६१/ पुणे | श्री. विलास पंढरीनाथ पाटील वरिष्ठ लिपिक, पोलीस आयुक्त | सहाय्यक पोलीस आयुक्त, पुणे शहर, पुणे | पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, पुणे शहर, पुणे | सन २००६-२००७ या कालावधीत पोलीस उप निरीक्षक श्री. यादव व श्री. निकम यांच्या कसुरीबाबत सादर | जन माहिती अधिकारी यांनी एक महिन्याच्या आत माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कार्यालय, पुणे, पुणे-१ | | | करण्यात आलेल्या टिप्पणीची प्रत व एकूण १२ मुद्द्यांची माहिती | मूळ अर्ज दि.२४.९.२००७ चा असून विलंबानंतरही एक महिन्याची मुदत मागणे योग्य नाही. याबाबत जन माहिती अधिकारी यांना समज देण्यात येत आहे. |
| ४ | १९४७/ पुणे | श्री. श्रीकांत ताराचंद दिवटे रा. नारायण - गांव, ता.जुन्नर, जि. पुणे | उप शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे | रोखलेल्या वार्षिक वेतनवाढ मिळणेबाबत तसेच विद्यार्थी संख्या नसतानाही वर्षभर बोगस तुकड्या चालवून शासन अनुदानाच्या अपहाराबाबत माहिती | अपीलकर्त्याने मागितलेली ती ही माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ५ | १९४५/ पुणे | श्री. विहार शिवाजीराव दुर्वे रा. ५७३/१, पवन विहार, साईपंप, जंगली महाराज रोड, पुणे | उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे | प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालय, संगम ब्रीज, पुणे | प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांचे वेबसाईट (संकेतस्थळ) प्रसिध्द करणेबाबत | जन माहिती अधिकारी ंनी दि.३१.१२.२००८ पर्यंत कार्यवाही करण्याबाबत प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ६ | १९६२/ पुणे | १.श्री. मारूती शाबू जगताप २. श्री. महादेव धोंडीबा पवार मु.पो.करूंज, ता. मावळ, जि. पुणे | मंडल अधिकारी, शेगाव, मु.पो. शेगांव, ता. जत, जि. सांगली | तहसीलदार, जत, तहसील कार्यालय, जत, ता. जत, जि. सांगली | वाळेखिडी येथील जुना सर्व्हे नं.२७१/१अ, १ब, २अ,२क, ३ व ४ बाबतचे फेरफार व जाबजबाब मिळणेबाबत | माहिती मिळाल्याचे अपीलकर्त्याने प्रपत्रात नमूद केले आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | १९९० / पुणे | श्री. हेमंत घनःशाम चोपडे रा. सोमवार पेठ, पोलीस वसाहत बिल्डिंग नं.३, रूम नं.८, पुणे | सहाय्यक पोलीस आयुक्त, (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे | पोलीस उप आयुक्त, मुख्यालय, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे-१ | दि. १३.११. २००७ चे पोलीस नोटिस नुसार ८ बीडीडी एस पथक, पुणे येथे नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांच्या अनुषंगाने माहिती | जन माहिती अधिकारी यांनी एक महिन्यात माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |
| ८ | १८५३/ पुणे | श्री. सतीश कुमार के.उदारे ३०१-ए, भाग्यदर्शन, काळे हॉस्पिटल मागे, भोसरी, पुणे | सहाय्यक निबंधक, वैधमापन शास्त्र, पुणे विभाग, भिमा शंकर वसाहत, बंगला नं.१६, येरवडा, पुणे | उप निबंधक, वैधमापन शास्त्र, पुणे विभाग, भिमा शंकर वसाहत, बंगला नं.१६, येरवडा, पुणे | पिठ गिरण्यांमध्ये इलेक्ट्रॉनिक काटा ठेवणे बंधनकारक करावे. | प्रस्तुत अपील अपीलकर्त्याने अपील निकाली काढण्याबाबत प्रपत्रात नमूद केले आहे. मूळ मागणी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. |
| ९ | १८३८ / पुणे | श्री. आलम अमिन तांबोळी रा. आळंदी (देवाची ), राजगुरूनगर, जि. पुणे | प्रशासन अधिकारी, आळंदी (देवाची), शिक्षण मंडळ, आळंदी, ता. राजगुरूनगर, जि. पुणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे | सन १९९६ ते २००८ या कालावधीतील मुख्याध्यापक पदाबाबत पदवीधर वेतनश्रेणी व वरिष्ठ वेतनश्रेणीबाबत | अपीलकर्त्याची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीच्या अनुषंगाने आहे. या बाबीचा समावेश माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत येत नाही. मात्र अनुषंगिक माहिती दिली पाहिजे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १० | १८३९ / पुणे | श्री. आलम अमिन तांबोळी रा. आळंदी (देवाची ), राजगुरूनगर, जि. पुणे | प्रशासन अधिकारी, आळंदी (देवाची ), शिक्षण मंडळ, आळंदी, ता. राजगुरूनगर, जि. पुणे | शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, पुणे | मुख्याध्यापकपद भरताना सेवा ज्येष्ठता विचारात न घेता प्रशासन अधिकाऱ्याने केलेल्या चुकीच्या कारवाईची माहिती | जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी १५ दिवसात माहिती देण्याचे प्रपत्रात नमूद केले आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. वरील तक्त्यात नमूद केलेली सर्व अपिले (क्र. १७६०, १६०७, १५६१, १९४७, १९४५, १९६२, १८९०, १८५३, १८३८ व १८३९ ) निकाली काढण्यात येत आहेत.

२ विशिष्ट मुदतीत माहिती देण्याबाबत उभयतांमध्ये एकमत झाले आहे, असे वरील अपिलांमध्ये नमूद केले आहे, तेथे पूर्तता करून जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी संबंधित मुदतीनंतर एक आठवड्यात अहवाल आयोगास सादर करावा. त्यानुसार पूर्तता न झाल्यास संबंधित अधिकारी नियमानुसार शास्ती व अन्य कारवाईस पात्र ठरतील.

**पुणे**
**दि. ३१.१२.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२६.११.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १७९० | श्री.विलास प्रभाकर रुद्र ५८७, बुधवार पेठ, जि.पुणे | सहाय्यक संचालक, नगर रचना पुणे विभाग, २८३, नारायण पेठ, जि.पुणे | उपसंचालक, नगररचना,७२/२, सहकारनगर, पुणे | मौजे साईव बु.ता.वेल्हा, जि.पुणे येथील गट नं.९५,९७ व १०१ चे भाग नकाशे मिळणेबाबत |
| २ | १७८९ | श्री.विलास प्रभाकर रुद्र ५८७, बुधवार पेठ, जि.पुणे | सहाय्यक संचालक, नगर रचना पुणे विभाग, २८३, नारायण पेठ, जि.पुणे | उपसंचालक, नगररचना,७२/२, सहकारनगर, पुणे | मौजे साईव बु.ता.वेल्हा, जि.पुणे येथील गट नं.९५,९७ व १०१ चे झोन दाखले मिळणेबाबत |
| ३ | २१४७ | श्री.विलास पुरुषोत्तम रबडे ११३७/१४, शिवाजीनगर, सुवर्ण वन, फ्लॅट नं.२, बापट हॉस्पिटल जवळ, जि.पुणे | सहाय्यक संचालक, नगर रचना पुणे विभाग, २८३, नारायण पेठ, जि.पुणे | उपसंचालक, नगररचना,७२/२, सहकारनगर, पुणे | मौजे हिंजवडी, ता.मुळशी स.नं.१३८ येथील जमीन कोणत्या कारणासाठी वापरता येते हे दर्शविणाऱ्या दस्तऐवजाची प्रत मिळणेबाबत |
| .४ | १७५३ | श्री.भगवानराव बाबुराव निंबाळकर निंबाळकर वस्ती, मु.पो.फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे | सहाय्यक संचालक, नगररचना पुणे विभाग, २८३, नारायण पेठ, जि.पुणे | उपसंचालक, नगररचना, ७४/२, सहकारनगर, पुणे | मौजे फुरसुंगी येथील गट नं.२३३ (जुना गट नं.१७९) चा झोन दाखला मिळणेबाबत |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | १७५४ | श्री.भगवानराव बाबुराव निंबाळकर निंबाळकर वस्ती, मु.पो.फुरसुंगी, ता.हवेली, जि.पुणे | सहाय्यक संचालक, नगररचना पुणे विभाग, २८३, नारायण पेठ, जि. पुणे | उपसंचालक, नगररचना, ७४/२, सहकारनगर, जि.पुणे | मौजे फुरसुंगी येथील गट नं.२३३ (जुना गट नं.१७९) चा भाग नकाशा मिळणेबाबत |

या सर्व अपिलांमध्ये पूर्ण कागदपत्रे सादर करण्यात आलेली नाहीत. तसेच अपीलकर्त्यांच्या वेगवेगळ्या कागदपत्रांवरील स्वाक्षरीत तफावत आहे. स्वाक्षरीतील फरकामुळे ते अधिकृत म्हणून मान्य करता येणार नाही. अनधिकृत व्यक्तीने सह्या केल्या असल्यास तो फौजदारी गुन्हा ठरेल. तसेच कार्यवाहीची माहिती मागितली असली, तरी कार्यवाही करावी व त्याची माहिती द्यावी, अशी मूळ मागणी आहे. ती माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील नाही. तसेच विभाग नकाशासारख्या कागदपत्रांच्या मागणीसाठी स्वतंत्र नियमावली आहे. तिचा वापर करणे आवश्यक आहे. या सर्व बाबी लक्षात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील अपील क्रमांक १७९०, १७८९, २१४७, १७५३ व १७५४ निकाली काढण्यात येत आहेत.

**पुणे**
**दिनांक : २३-१२-२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे "विशेष अपील निर्गत कार्यक्रम" दि.१६.१२.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्त्याचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १८०७ | श्री.प्रशांत रघुनाथ कुलकर्णी सी-१/४, तोडकर टाऊनशीप, ससाणेनगर, हडपसर, पुणे ४११ ०२८ | उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९२२१, मनोहरदास स्ट्रीट, भाटिया रक्षक स्कूल जवळ, फोर्ट, मुंबई-४११ ००१ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, १९२२१, मनोहरदास स्ट्रीट भाटीया रक्षक स्कूल जवळ, फोर्ट, मुंबई-४११ ००१ | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,यांनी शिफारशी करुन मा.सचिव (उद्योग), उद्योग ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय,मुंबई यांना दि.०७.०६.२००६ रोजी पाठविलेल्या पत्राची छायांकित प्रत. |
| २ | १९८७ | श्री.शेखर द.साळी वृंदावन हौ.कॉ., सेक्टर डी, फ्लॅट बी-१३, पौड रोड, कोथरुड, पुणे-४११ ०३८ | विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था वर्ग-१, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म. रा.,पुणे यांचे कार्यालय, पुणे-४११ ००१ | अपर निबंधक, सहकारी संस्था (ले.प.), सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, म. रा.,पुणे यांचे कार्यालय, पुणे-४११ ००१ | लेखापरीक्षणाच्या अहवालाची चौकशी होणेबाबत केलेल्या अर्जाच्या कार्यवाहीची माहिती |
| ३ | २०८० | श्री.दादा गुलाब देशमुख लोणी खुर्द, ता.राहाता, जि.अहमदनगर | उप विभागीय अभियंता, सा.बां., उपविभाग, वेल्हा, जि.पुणे | अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे-४११ ००१ | उप विभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, वेल्हा, जि.पुणे यांचे उपविभागात दि.०१.०४.२००७ ते २४.०३.२००८ या कालावधीत झालेल्या एकूण कामांची व तदनुषंगिक १६ मुद्यांची माहिती |
| ४ | २१०९ | श्री.दशरथ नानासाहेब राऊत मु.पो.खांडज, ता.बारामती, जि.पुणे | सचिव, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ, माळेगाव बु. ता.बारामती, जि.पुणे | चेअरमन, शिवनगर विद्या प्रसारक मंडळ,माळेगाव बु.ता.बारामती, जि.पुणे | संस्थेच्या विश्वस्त मंडळाची व महाराष्ट्र शासनाची मान्यता न घेता संस्थेचे सचिव व प्रमुख शाळा सहाय्यक यांनी स्वतःच्या स्वाक्षरीने काही कर्मचाऱ्यांचे मूळ वेतनवाढीबाबत केलेल्या आदेशांची माहिती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | २११६ | श्री.पंडीत भिमराव जगताप<br>५४८, कृष्ण कुंज निवास, पारिजात कॉलनी, हडपसर, पुणे ४११ ०२८ | व्यवस्थापक, सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित, प्रधान कार्यालय-२०७/८/९,गोल्डफिंच पेठ, सोलापूर-४१२ ००७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,माढा, ता.माढा, जि.सोलापूर | आकुलगाव, ता.माढा विविध का.सेवा.स.सोसायटीसाठी तारण असलेल्या जमीन हस्तांतरण, कर्ज प्रकरण अधिकारपत्रे, नोंदी प्रमाणित करणे, बोजा दुसऱ्या गटावरती टाकणे इ.तदनुषंगिक माहिती |
| ६ | २१२६ | श्री.गजानन विठ्ठल जोशी<br>स.नं.१४/१, इमारत क्र.२४/३, गोपाळ हौ.सो.गणेशनगर, धायरी, पुणे-४११ ०४१ | शाळाप्रमुख, श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला, पुणे महानगरपालिका, ५३१, भवानी पेठ, पुणे-४११ ०४२ | शिक्षणाधिकारी, माध्यमिक व तांत्रिक शिक्षण, पुणे महानगरपालिका, पुणे-४११ ००५ | महाराष्ट्र शासनाने निवडश्रेणी देण्यासंबंधीचे नियम व अटींमध्ये केलेल्या सुधारणांनुसार / शिथिल केलेल्या अटींनुसार निवडश्रेणी देणेबाबतच्या कार्यवाहीची माहिती |
| ७ | २१२७ | श्री.विनोद सुभाष जवळकर<br>अे/२, मुक्तानंद सोसायटी, सर्व्हे नं.११, चव्हाणनगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३ | अभियंता, सहकारनगर क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे - सातारा रोड, उत्सव बिल्डिंग, पुणे ४११ ००९ | उपायुक्त क्र.३, पाणीपुरवठा विभाग, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ | पुणे -सातारा रोड स.नं.१८ परिसरातील झोपडपट्टीतील दुकानदाराने घेतलेल्या बेकायदेशीर नळजोडणीबाबत एकूण ४ मुद्यांबाबतची माहिती |
| ८ | २१२८ | श्री.विनोद सुभाष जवळकर<br>अे/२, मुक्तानंद सोसायटी, सर्व्हे नं.११, चव्हाणनगर, धनकवडी, पुणे ४११ ०४३ | नगर अभियंता, बांधकाम नियंत्रण कक्ष, पुणे महानगरपालिका, पुणे | विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण कक्ष, पुणे महानगरपालिका, पुणे | बिबवेवाडी येथील सर्व्हे नं.६७०,६७१ येथील बांधकामाबाबतची माहिती |
| ९ | २१३२ | श्री.बाबु महादेव जंगम<br>तर्फे श्री.भिमराव बाबुराव जंगम, रा.४५/९/अ, सोमनाथनगर, सोमनाथ मंदिराजवळ, वडगावशेरी, जि.पुणे-४११ ०१४ | तालुका निरीक्षक, भूमी अभिलेख, पाटण, जि.सातारा | कार्यालय अधीक्षक, उपसंचालक, भूमी अभिलेख यांचे कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, १ ला मजला, पुणे-१ | दिवशी खुर्द, ता.पाटण, जि.सातारा सर्व्हे नं.१२९ मधील हिस्सा नं.२ चा ७/१२, गटवारी, मोजणी, नकाशे, फाळणी इ.बाबतची माहिती |
| १० | २१२९ | श्री.कैलास बापू आबनावे<br>सर्व्हे नं.५३/१६, विकास नगर, | नगर उप अभियंता, विकास योजना, बांधकाम नियंत्रण विभाग क्र.४, | विकास अभियंता, बांधकाम नियंत्रण कक्ष, पुणे महानगरपालिका, | पुणे पेठ वानवडी स.नं.५३ हि.नं.३ येथील जागेवर रस्त्याची आखणी केलेली असून त्याबाबत नकाशासहित माहिती |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | वानवडी, पुणे-४११ ०४० | शिवाजीराव ढेरे उद्योग भवन, टिळक रोड, पुणे महानगरपालिका, पुणे ४११ ०३० | पुणे ४११ ००५ | |
| ११ | २१०४ | श्री.पी.डी.थिटे मु.पो.केंदूर, ता.शिरुर, जि.पुणे | उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे, पुणे ४११ ०००१ | शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद पुणे, पुणे ४११ ०००१ | सन १९९५-१९९६ मध्ये झालेल्या भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाज् माहितीबाबत व अपील निकाली काढण्याबाबत एकमत झाले. प्राप्त माहिती समाधान झाले असल्याचे अपीलकर्त्यांनी मान्य के आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

वरील अपील क्रमांक १८०७, १९८७, २०८०, २१०९, २११६, २१२६,२१२७, २१२८, २१३२, २१२९ व २१० निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दिनांक :** 23/12/2008